लोकमत

# हॅलो औरंगाबाद

औरंगाबाद, रविवार, दि. १७ डिसेंबर २०१७



1983 पासून सेवेत श्रीमान श्रीमती

लेडिज व जेंट्स् वुलन स्वेटर्सचा फ्रेश स्टॉक ...

स्वेटर्स, जॅकेट, थर्मल वेअर, शॉलस, ब्लँकेट्स

टिळक पथ, औरंगाबाद.फोन-2339184



वाढत्या वीजबिलामुळे सोलार वॉटर हीटर बसवला आणि माझा कष्टाचा पैसा 3 वर्षात वसूल झाला!

भारतातील सर्वाधिक लोकप्रिय सुदर्शन सौर सोलार वॉटर हिटर

आता सुलभ हप्त्यात BAJAJ FINSERV 0*% व्याजदर ₹ 0*/- डाऊन पेमेंट

समझदारी की सोच!

Sudarshan Saur

9225319660 / 9225319666


# जिद्द असली की मैदानही अपुरे! बायपास होऊनही ते धावणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** बायपास सर्जरी झाल्यानंतर कुणी धावत असेल यावर आपला विश्वास बसणार नाही, शिवाय २१ किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये ते धावतील हे अशक्यच आहे, असेही तुम्ही म्हणाल; मात्र 'जिद्द असली की, मैदानही अपुरे' अशी नवी म्हण तयार करायला ते सज्ज झाले आहेत. हृदयाची बायपास सर्जरी झालेले मुंबईतील काही ज्येष्ठ नागरिक 'लोकमत'तर्फे रविवारी औरंगाबादमध्ये होत असलेल्या महामॅरेथॉनमध्ये धावणार आहेत. यामध्ये अगदी पंचाहत्तरी गाठलेलेही तरुणतुर्क आहेत.

आश्चर्य वाटले ना! हो... बायपास झालेल्या तरीही शरीरात प्रचंड ऊर्जा असलेल्या बारा ते तेरा जणांचा हा ग्रुप रविवारी अगदी पहाटेच औरंगाबादच्या गारखेडा भागातील विभागीय क्रीडा संकुलावर धावण्यासाठी सज्ज राहणार आहे.

### ग्रुपमधील प्रत्येक सदस्यांत ऊर्जा

> या ग्रुपमधील प्रत्येक सदस्य प्रचंड ऊर्जेने भारावलेला आहे. माझी २००७ मध्ये बायपास सर्जरी झाली. सर्जरीआधीही मी पळत होतो. सर्जरी झाल्यानंतर काही दिवसांनी मी माझे रनिंग कायम ठेवले. मी धावतोय, मग इतर का धावू शकणार नाहीत, असा विचार मनात आला. आता मी ६१ वर्षांचा आहे. आता अनेकजण आमच्या ग्रुपमध्ये जॉईन झाले आहेत.
>
> **- व्यंकटरमण पिचुमणी,** मार्गदर्शक

बायपास सर्जरी झाल्यानंतर आपण समाजावर आणि परिवारावर ओझे होऊ का, अशी मनात भीती न बाळगता ही मंडळी धावायला लागली. त्यांना व्यंकटरमण पिचुमणी यांचे मार्गदर्शन लाभले आणि आता हा बारा-तेरा जणांचा ग्रुप देशभरातील विविध मॅरेथॉनमध्ये सहभागी होत असतो.

या ग्रुपमधील सदस्यांनी लोकमत भवन येथे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा यांची भेट घेतली. औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्याच्या भूमिकेबाबत या ज्येष्ठ नागरिकांनी चर्चाही केली.

बायपास सर्जरी झाली म्हणजे आपल्या हालचालींवर मर्यादा आल्या, असेच अनेक जण समजतात; मात्र या समजाला छेद देण्याचे काम या ज्येष्ठ नागरिकांनी केले आहे. बायपास झाली म्हणजे स्वत:ला आजारी समजणारे, तसेच व्हीलचेअरचा वापर करणारेही अनेक जण दिसतात. या सर्वांना ऊर्जा देण्याचे आणि मनात ऊर्मी भरण्याचे काम या ग्रुपतर्फे होताना दिसत आहे.

अर्थात महामॅरेथॉनमध्ये धावणारी ही सर्व मंडळी अतिशय ताजीतवानी असल्याचे दिसले. गेल्या काही दिवसांत किंवा वर्षांत धावण्याच्या सरावामुळे ही मंडळी शारीरिकदृष्ट्या अगदी 'फिट' आहेत आणि मनानेही तरुण आहेत. नियमित 'एक्सरसाईज' आणि 'चिअरफुल लाईफ' असे त्यांचे जगणे आहे. यापैकी अनेक जण स्वत:चा व्यवसायही उत्तमपणे सांभाळत आहेत.

या ग्रुपमधील व्यंकटरमण पिचुमणी वगळता सर्वच सदस्य हे बायपास सर्जरी झाल्यानंतर धावायला लागले. सर्जरी होण्याआधी यांच्यापैकी कुणीही धावत नव्हते आणि आता तर अगदी प्रोफेशनल मॅरेथॉनमध्ये ते धावत आहेत. मनात जिद्द असली की, कोणतीही गोष्ट अशक्य नाही, याची प्रचीती या ग्रुपने आणून दिली आहे. याचे श्रेय मार्गदर्शक व्यंकटरमण पिचुमणी यांना आणि या ज्येष्ठांच्या जिद्दीला जाते. तरुणांना लाजवेल आणि ज्येष्ठांना मार्गदर्शक ठरेल, अशीच या ग्रुपची (पान २ वर)

### त्यांना सलामच करावा लागेल



औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या ज्येष्ठांच्या ग्रुपसमवेत (मध्यभागी) 'लोकमत'चे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा. अगदी डावीकडे महामॅरेथॉनच्या संचालिका रुचिरा दर्डा. छायाचित्रात ग्रुपचे मार्गदर्शक व्यंकटरमण पिचुमणी आणि संजय पाटील दिसत आहेत.

## महत्त्वाचे

### महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे अध्यक्ष न्या. चांदीवाल यांचा दौरा

**औरंगाबाद :** महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती के. यू. चांदीवाल हे २३ डिसेंबर २०१७ ते २८ जानेवारी २०१८ (शासकीय सुट्या वगळून) न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी घेणार आहेत. न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठांतर्गत येणाऱ्या औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली व नांदेड तसेच अहमदनगर, नंदुरबार, धुळे व जळगाव जिल्ह्यांतील सर्व विधिज्ञ व पक्षकार यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या प्रबंधक पी. आर. चोंडेकर यांनी केले आहे.


LMS Trusted Since 1944 लालचंद मंगलदास सोनी जेम्स ॲण्ड ज्वेलर्स प्रा.लि. Govt. Approved Valuer

सोने, चांदी आणि ज्वेलरीविषयी संपूर्णत: आणि विश्वासार्ह माहिती जाणून घेण्यासाठी

CNX पान क्र. ५ वाचा


### गुजरात निवडणूक अन्वयार्थ परिसंवादाचे आयोजन

**औरंगाबाद :** देशभर गुजरात निवडणुकीची चर्चा सुरु आहे. या निवडणुकीत कोण बाजी मारणार यावर विविध ठिकाणी पैजा लावण्यात येत आहेत. या निवडणुकीत भाजपची लाट की काँग्रेसचे 'अच्छे दिन' येणार याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. त्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम वृत्तपत्र महाविद्यालयातर्फे लोकसंवाद उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि.१९) सकाळी ११ वाजता आईनस्टाईन सभागृह 'गुजरात निवडणूक अन्वयार्थ' या विषयावर विशेष परिसंवाद आयोजित केला आहे. या परिसंवादात गुजरातमध्ये वार्तांकनासाठी गेलेले पत्रकार संजय मिस्कीन, अभिजित ब्रह्मनाथकर व राजकीय विश्लेषक श्रीकांत देशपांडे सहभागी होणार आहेत. या परिसंवादास उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नीलेश राऊत आणि प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांनी केले आहे.

### आयुक्त मुगळीकर शहरात दाखल

**औरंगाबाद :** महापालिका आयुक्त डी. एम. मुगळीकर मसुरी येथील प्रशिक्षण संपवून शनिवारी सायंकाळी शहरात दाखल झाले. सोमवारी महापालिकेची सर्वसाधारण सभा असल्याने आयुक्त त्वरित रुजू होण्याची शक्यता कमी आहे. आठ दिवस सुट्टी टाकून ते आराम करण्याच्या मूडमध्ये असल्याचे बोलले जात आहे. २४ कोटी रुपयांच्या रस्ते प्रकरणात महापालिकेला खंडपीठात शपथपत्र सादर करावे लागणार आहे. त्यामुळे आणखी आठ दिवस तरी मनपाचा कारभार जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनाच पाहावा लागणार आहे.

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**औरंगाबाद :** लग्न जुळत नसल्याने



आलेल्या नैराश्यातून मोटार मेकॅनिकने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कटकटगेट परिसरात शनिवारी (दि.१६) सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी जिन्सी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. शेख अन्वर शेख इलियास ऊर्फ पप्पू (२७) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, शेख अन्वर हा ट्रक मेकॅनिक होता. शुक्रवारी रात्री दहा वाजेपर्यंत तो मित्रांसोबत गप्पा मारत बसला. यानंतर तो घरी गेला. रात्री केव्हातरी त्याने दोरीने पंख्याला बांधून गळफास घेतला. सकाळी ९ वाजेपर्यंत तो झोपेतून न उठल्याने दार तोडले असता पप्पूने गळफास घेतल्याचे त्यांना दिसले. त्याला तात्काळ घाटीत दाखल केले. मात्र त्याचा आधीच मृत्यू झाला होता.

**खर्च शून्य :** फक्त इच्छाशक्तीच्या बळावर यंत्रणा लागली कामाला

# अतिक्रमणे रात्री काढणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** शहरातील मुख्य रस्त्यांचा श्वास मोकळा करण्याची प्रक्रिया शनिवारपासून महापालिकेने सुरु केली. सायंकाळी सहा ते रात्री दहापर्यंत मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत. एका वाहनावर ध्वनिक्षेपक लावून अतिक्रमण केलेल्या छोट्या-छोट्या व्यावसायिकांना अतिक्रमण काढून घेण्याचे आवाहन करण्यात येईल. यानंतरही अतिक्रमण न काढल्यास त्वरित कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. मुख्य रस्त्यांवरुन दुचाकी, चारचाकी वाहने सहज ये-जा करु शकतील एवढा रस्त्यांचा श्वास मोकळा करण्यात येणार आहे.

शुक्रवारी महापौर नंदकुमार घोडेले यांनी अतिक्रमण हटाव पथकाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे त्वरित हटविण्यात यावीत. एका वाहनावर ध्वनिक्षेपक लावून दररोज विविध रस्त्यांवर पथक फिरविण्यात यावे.

नागरिकांना, वाहनधारकांना अजिबात त्रास होणार नाही, अशी व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यानंतर प्रशासकीय विभागाची यंत्रणा लगेच कामाला लागली. शनिवारी एका जीपवर युद्धपातळीवर ध्वनिक्षेपक बसविण्यात आला. सायंकाळी सहा वाजता प्रशासकीय अधिकारी सी. एम. अभंग, पदनिर्देशित अधिकारी प्रभाकर पाठक, इमारत निरीक्षक सय्यद जमशीद, गवळी आदी कर्मचाऱ्यांचा ताफा महापौरांनी रवाना केला.

या पथकाने पोलिसी बंदोबस्तात शहागंज चमनपासून स्तुत्य उपक्रमाला सुरुवात केली. महापालिकेचा ताफा पाहताच रस्त्यांवरील हातगाड्या, फेरीवाले सैरावैरा पळू लागले. अचानक सुरु झालेल्या या कारवाईमुळे शहरातील त्रस्त नागरिकांनाही हायसे वाटले. पथकाने शहागंज चमनचा श्वास चारही बाजूंनी मोकळा केल्यावर मोर्चा गांधी पुतळा सिटीचौककडे वळविला.

सिटीचौक ते गुलमंडी आणि नंतर पैठणगेटपर्यंत अतिक्रमण केलेल्या हातगाडी, फेरीवाल्यांना उद्यापासून रस्त्यावर याल तर कारवाईस सामोरे जावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला. काही ठिकाणी रस्त्यांवरच खुर्च्या, हातगाड्या लावल्या होत्या. हे सर्व साहित्य महापालिकेच्या पथकाने जप्त केले. महापालिकेला हा उपक्रम राबविण्यासाठी एक रुपयाही खर्च आला नाही. फक्त उपलब्ध यंत्रणेला कामाला लावण्यात आले.

### व्यापाऱ्यांसह नागरिकही आनंदी

- नोटाबंदी, जीएसटीने अगोदरच व्यापाऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. गुलमंडी, रंगारगल्ली, टिळकपथ, पैठणगेट येथे व्यापाऱ्यांनी लाखो रुपये भाडे भरुन दुकाने सुरु केली आहेत. या दुकानांसमोर २४ तास हातगाड्या, फेरीवाल्यांचा मुक्त संचार असतो.
- दुकानात येणाऱ्या ग्राहकाला दुचाकी वाहनही उभे करण्यासाठी जागा नसते. त्यामुळे मनपाच्या कारवाईचे व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. महापालिकेची सायंकाळी सुरु झालेली कारवाई पाहून दुचाकी वाहनधारकांनी मनपाच्या पथकाचे आभार मानले.



# घाटीतील पाणीपुरवठा विस्कळीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** घाटी रुग्णालयातील पाणीपुरवठ्याची वेळ महानगरपालिकेकडून पाळली जात नाही. परिणामी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. ड्रेनेजलाईन सातत्याने तुंबत असल्याने दुर्गंधी पसरते. कचराही उचलण्याकडे दुर्लक्ष होते. घाटीतील अशा अनेक समस्यांवर शनिवारी पार पडलेल्या बैठकीत चर्चा करून तोडगा काढण्यात आला.

खा. चंद्रकांत खैरे, महापौर नंदकुमार घोडेले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर, उपअधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. भारत सोनवणे, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास गडप्पा, डॉ. राजन बिंदू, डॉ. वर्षा रोटे आदी उपस्थित होते. यावेळी घाटीतील विविध बांधकामे, सुरक्षा भिंत, अंतर्गत रस्ते, फर्निचरसह केंद्र आणि राज्य शासनाकडे प्रलंबित प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला.

११७७ खाटांच्या रुग्णालयास नियमित वेळेवर पुरेसे पाणी मिळत नाही. त्यामुळे अनेक अडचणी येतात. वेळेवर आणि पुरेशा दाबाने पाणी द्यावे. ड्रेनेजलाईन ६० वर्षे जुनी झाली आहे. अनेकदा ती तुंबते. कचऱ्याचाही प्रश्न आहे.

वर्षाला जवळपास ८० लाखांचा कर भरला जातो. त्यामुळे या समस्यांसंदर्भात महापालिकेने मदत करावी, अशी मागणी घाटीतर्फे करण्यात आली. यावेळी महापौर घोडेले यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना या समस्या दूर करण्याची सूचना केली.

# छावणीत पुन्हा गॅस्ट्रो?

**म्हणे जुनेच रुग्ण :** नियंत्रणात असल्याचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** छावणी परिसरातील गॅस्ट्रोची परिस्थिती अद्यापही कायम आहे. छावणी सामान्य रुग्णालयात गेला आठवडाभर गॅस्ट्रोच्या रुग्णांचा ओघ सुरु राहिला. त्यामुळे गॅस्ट्रो नियंत्रणात असल्याचा दावा फोल ठरत आहे.

छावणी सामान्य रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात आठवडाभरात गॅस्ट्रोच्या अनेक रुग्णांनी उपचार घेतले. जवळपास २० रुग्णांनी उपचार घेतले; परंतु हे सर्व रुग्ण जुनेच असून, एकही रुग्ण नवीन नसल्याचे छावणी सामान्य रुग्णालयाच्या आरएमओ डॉ. गीता मालू यांनी सांगितले. रुग्णांची संख्या अधिक असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

छावणी परिसरात ११ नोव्हेंबर रोजी २५० पेक्षा अधिक नागरिकांना गॅस्ट्रोची लागण झाल्याचे समोर आले. छावणी सामान्य रुग्णालयात तब्बल १२ दिवस गॅस्ट्रोचे रुग्ण दाखल होत होते. रुग्णांची संख्या अवघ्या काही दिवसांत सहा हजारांवर पोहोचली. त्यानंतर रुग्णांचा ओघ थांबला. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले; परंतु गेल्या काही दिवसांत परिसरातील नागरिकांना अद्यापही गॅस्ट्रोचा त्रास होत असल्याचे दिसते.

### बाहेरचे पदार्थ टाळावेत

> रुग्णालयात येणारे सर्व रुग्ण जुनेच आहेत. नागरिकांनी काळजी घेतली पाहिजे. बाहेरचे खाद्यपदार्थ खाणे टाळले पाहिजे. छावणी परिसरासाठी नवीन जलवाहिनी टाकण्यास आज मंजुरी मिळाली आहे.
>
> **-संजय गारोल,** उपाध्यक्ष, छावणी परिषद

### गुन्हा दाखल करा

एक महिना उलटूनही छावणी परिषदेने काहीही ठोस पाऊल उचललेले नाही. गॅस्ट्रोची परिस्थिती अजूनही सामान्य झालेली नाही. या सर्व प्रकाराची चौकशी करून छावणी परिषदेवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी छावणी विकास युवा मंचने एका निवेदनाद्वारे सहायक पोलीस आयुक्त ज्ञानोबा मुंडे यांच्याकडे केली आहे. निवेदनावर शेख कासीम, मयंक पांडे, ॲड. इद्रीस इब्राहिम, पाशा खान, ओंकार सिंग, सय्यद रशीद, अतुल राठोड, शेख सिद्दीक यांची नावे आहेत.

# श्वान पथकाची उल्लेखनीय कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** खून, दरोडा, घरफोडीसारख्या अनेक गुन्ह्यांची उकल करण्यात ग्रामीण पोलीस दलातील श्वान पथकाने उल्लेखनीय कामगिरी बजावल्याचे समोर आले आहे. या श्वान पथकाला जानेवारीपासून कालपर्यंत तब्बल १०५ कॉल्स प्राप्त झाले आणि प्रत्येक कॉल्सला श्वानांनी तेवढ्याच तत्परतेने प्रतिसाद देऊन गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना मदत केली.

खून असो अथवा दरोड्यासारखा गंभीर गुन्हा घडल्यानंतर पोलीस अधिकारी-कर्मचारी घटनास्थळी धाव घेतात आणि आरोपीचा माग काढण्यासाठी सर्वप्रथम श्वान पथकाला फोन करून घटनास्थळी बोलावून घेतात. ग्रामीण भागात शेतवस्ती, वाडी अथवा तांड्यावर दरोडे पडतात. ज्या ठिकाणी वाहने जाऊ शकत नाहीत, अशा ठिकाणी पायी जाऊन दरोडे टाकण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. दरोडेखोर अज्ञात असतात. त्यांना कोणीही पाहिलेले नसते. अशावेळी ते कोठून आले अथवा कोणत्या दिशेने पळाले, याबाबतचा अचूक माग काढून पोलिसांच्या तपासाला दिशा देण्याचे काम पोलिसांच्या श्वान पथकातील गुन्हे शोध श्वान करीत असते. ग्रामीण पोलीस दलात स्वीटी आणि खुशी हे गुन्हे शोध श्वान आहेत. ग्रामीण भागात जानेवारीपासून कालपर्यंत तब्बल १०३ गुन्ह्यांचा शोध घेण्यासाठी दोन्ही श्वानांना बोलावण्यात आले होते. यासाठी श्वान पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक एम.बी. घुगे, सहायक उपनिरीक्षक नासेर पठाण, जमादार गणेश व्यवहारे , प्रकाश मिसाळ, एस.व्ही.तळेकर हे श्वान हॅण्डलर आहेत.

**मारेकऱ्याच्या दारात गेले श्वान**

उपनिरीक्षक घुगे म्हणाले की, सिल्लोड तालुक्यातील मोढा बुद्रुक येथे ११ डिसेंबर रोजी एका महिलेचा गळा आवळून खून केल्यानंतर प्रेत एका शेतातील विहिरीजवळ नेऊन टाकून आरोपी पसार झाले होते. दुसऱ्या दिवशी श्वान पथकाला पाचारण केले. घटनास्थळी आरोपीची सापडलेली चप्पल हुंगल्यानंतर श्वान थेट आरोपीच्या घरापर्यंत गेले. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेताच त्याने गुन्ह्याची कबुली देत अन्य आरोपींची नावे आणि खुनाचे कारणही सांगितले. (पान २ वर)



ग्रामीण पोलिसांच्या श्वान पथकासोबत पोलीस उपनिरीक्षक एम.पी. घुगे आणि कर्मचारी.

### व्हीआयपी बंदोबस्तप्रसंगी श्वानाची मदत

- जगप्रसिद्ध अजिंठा आणि वेरुळ लेण्यांना भेटी देण्यासाठी देश-विदेशातील व्हीव्हीआयपी लोक औरंगाबादेत येतात. राजकीय नेत्यांचे दौरेही होतात. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बॉम्बशोधक श्वान पथकाकडून त्यांच्या दौऱ्यापूर्वी तपासणी केली जाते. ग्रामीण पोलीस दलात रेनो आणि गुरुनो ही दोन श्वान बॉम्बशोधक आहेत. त्यांचीही उल्लेखनीय कामगिरी राहिलेली आहे. देशपातळीवरील पोलीस श्वान मेळाव्यात या श्वानांनी पारितोषिके प्राप्त केली आहेत.


नव्या वर्षाची सुरूवात सहलीने करा...!

राजस्थान 15 जानेवारी | दुबई (शॉपिंग फेस्टीवल) 19 जानेवारी | सिंगापुर मलेशिया थायलंड 19 जानेवारी | अंदमान 19 जानेवारी/23 फेब्रुवारी | केरळ 23 जानेवारी | श्रीलंका 28 जानेवारी

पाहिजे तेव्हा, पाहिजे तेथे सहलीचे आयोजन

हेरंब ट्रॅव्हल्स एकनाथ रंगमंदिराच्या बाजुला, उस्मानपुरा, औरंगाबाद फोन : 7410047045, 9422690119



LIVE A FULL LIFE IN THE HEART OF CITY !

Amrut Sai Jai's EKDANT

Road Facing Shops, Showrooms, 3 & 4 BHK Flats

Specious central lobby & waiting lounge on every floor

Video Door phone as an additional security

Lift with battery back-up & Many more

Site: Opp. Yashomangal Karyalaya, Osmanpura, Aurangabad

Call: 9823441147, 9011003747

MAHA RERA NO: P51500012339

AMRUT DEVELOPERS मनातले घर वसवणारी माणसं !

Member CREDAI AURANGABAD

Labh Chambers, Station Road, Aurangabad

An ISO Certified Company | www.amrutdevelopers.com



Hamdard NATURE WONDER

शुगरवर कंट्रोल... नैसर्गिकरित्या

मेथी, कलोंजी आणि कडुलिंबासारख्या नैसर्गिक घटकांचा प्रभावी फॉर्म्युला जो रक्त शर्करा नियंत्रित करण्यात मदत करतो.

Diabeat HEALTHY BLOOD SUGAR

1800 1800 108 | /hamdardnaturewonder

अधिक माहिती आणि सल्ल्यासाठी लॉग ऑन करा: www.hamdard.in

केमिस्ट, युनानी आणि आयुर्वेदिक स्टोअर्स तसेच हमदर्द वेलनेस सेंटर्सवर उपलब्ध